**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प.),**
**ा.वसई, जि.पालघर - ४०१ ३०३.**

**दूरध्वनी :** ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
**फॅक्स :** ०२५० – २५२५१०७
**ई-मेल :**vasaivirarcoporation@yahoo.com

**जावक क्र: व.वि.श.म./**
**दिनांक :**

# श्वान निर्बीजीकरण केंद्रावरील भेटीबाबत नियमावली

१. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती डी येथील श्वान निर्बीजीकरण केंद्रावरील श्वानांना दिवसातून २ वेळा संबंधित श्वान प्रेमी व इतर भेट देऊ शकतात. श्वान निर्बीजीकरण केंद्रावर श्वान प्रेमी व इतर यांनी भेट देणेपुर्वी आधी संपर्क साधुन भेटीची वेळ निश्चित करणे आवश्यक आहे. (भेटीची वेळ निश्चित करणे करिता संपर्क क्र. ९८६७१२१३४५)

२. भेटीच्या वेळी एका वेळेस फक्त २ व्यक्तींना (१० min करिता) प्रवेश दिला जाईल. एकाच व्यक्तीने सतत श्वान केंद्राला भेटी देऊ नये.

३. भेटीची वेळ :- सकाळी ११:०० ते १२:०० व दुपारी ०३:०० ते ०४:०० वाजता.

४. भेटीच्या वेळी श्वान केंद्रामध्ये संबंधितांनी मोबाईल फोन, कॅमेरा, वही, पेन इ. वस्तु नेण्यास सक्त मनाई आहे.

५. भेटीच्या वेळी गोंगाट, मोठ्याने बोलणे टाळावे.

६. मद्य प्राशन करून तसेच मादक पदार्थाचे सेवन करुन किंवा मादक पदार्थ व खाद्य पदार्थ सोबत घेऊन केद्रास भेट देण्यास सक्त मनाई आहे.

७. श्वान प्रेमी व इतर यांनी केंद्रावर भेटी दरम्यान केंद्रातील कार्यरत कर्मचारी यांचेशी वादविवाद टाळावे.

८. श्वान प्रेमी व इतर यांनी केंद्रावर भेटी दरम्यान काही तक्रार असल्यास संबंधित विभागास पत्राद्वारे कळवावे.

९. श्वानांना स्पर्श करणे, उचलणे, पिंजरे उघडणे किंवा त्यांना त्रास होईल असे वर्तन करणे प्रतिबंधित राहील.

१०.निर्बीजीकरण प्रक्रियेदरम्यान शस्त्रक्रिया कक्ष, उपचार कक्ष किंवा प्रतिबंधित क्षेत्रात विनापरवानगी प्रवेश करणे मनाई राहील.

११.केंद्रातील श्वानांना परवानगीशिवाय अन्न, औषधे किंवा इतर कोणतीही वस्तू देणे मनाई राहील.

१२.पशुवैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या कामात हस्तक्षेप करणे किंवा उपचार प्रक्रियेत अडथळा निर्माण करणे मनाई राहील.

१३.केंद्रातील नोंदी, कागदपत्रे किंवा वैद्यकीय माहिती विनाअनुमती पाहणे/मागविणे मनाई राहील.

१४.प्रशासनाने निर्धारित केलेल्या भेटीच्या वेळेव्यतिरिक्त केंद्रात प्रवेश देण्यात येणार नाही.

१५.केंद्र परिसरात कोणत्याही प्रकारचे आंदोलन, वादविवाद, कर्मचाऱ्यांना धमकी किंवा कामकाजात अडथळा निर्माण करणे कडक मनाई राहील.

**टीप :- सदर नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित व्यक्तींवर नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.**

Digitally signed by
Archana Sudhir Ghotkar
Date: 17-07-2026
12:27:16

**(अर्चना दिवे)**
**उपायुक्त**
**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**